## न्यूज ब्रिफ

### चोरीच्या उद्देशाने संशयितरीत्या फिरणारा अटकेत !

चाळीसगाव : प्रतिनिधी

तोंडाला रूमाल बांधून चोरीच्या उद्देशाने संशयितरीत्या फिरणाऱ्या मालेगावच्या तरुणाला मंगळवारी चाळीसगाव शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्यावर पोलिस कायदा कलम १२२ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे कि, चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनचे हवालदार अजय पाटील, पोलिस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर पाटोळे, विलास पवार, समाधान पाटील हे मंगळवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास शहरातील सराफ गल्ली परिसरात रात्री पेट्रोलिंग करीत असताना एक इसम अंधारात तोंडाला रूमाल बांधून चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत होता. त्यास ताब्यात घेतले. त्याची विचारपूस समाधानकारक केली असता तो उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. मोहम्मद सुब्राती मोहम्मद रफीक (२५, बिस्मिल्लाह नगर, मालेगाव, जि. नाशिक) असे त्याचे नाव असून, त्याच्या अंगझडतीत स्क्रू ड्रायव्हर व चार चाव्यांचा गुच्छा मिळून आला. पोलिसांनी संशयित मोहम्मद सुब्राती मोहम्मद रफीक यास ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध पोकॉ. विलास पवार यांच्या फिर्यादीवरून चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १२२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

### अमळनेरात बजरंग दल,विहिंपची मागणी

## बंगालमधील हिंसाचाराची एनआयएकडून चौकशी करा



अमळनेर: प्रतिनिधी

बंगालमधील हिंसाचाराची एनआयएकडून चौकशी करावी आणि दोषींना तात्काळ शिक्षा व्हावी. तेथील कायदा आणि सुव्यवस्थेचे नियंत्रण केंद्रीय सुरक्षा दलांकडे सोपवावे. तसेच बंगालमध्ये तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात प्रांताधिकाऱ्यांच्या माध्यमातून राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना ओळखले पाहिजे आणि त्यांना हाकलून लावले पाहिजे. बंगाल आणि बांगलादेशमधील ४५० किलोमीटरच्या सीमेवर तारा टाकण्याचे काम, जे ममता बॅनर्जी यांनी थांबवले होते, ते त्वरित सुरू करावे. राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि जातीय सलोखा राखण्यासाठी आपण त्वरित कारवाई कराल अशी अपेक्षा देखील राष्ट्रपतींकडे व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की वक्फ कायद्याच्या विरोधाच्या नावाखाली ज्या प्रकारे संपूर्ण बंगाल हिंसाचाराच्या आगीत जाळले जात आहे, हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत, राष्ट्रविरोधी आणि हिंदूविरोधी घटकांना त्यांचे कट कोणत्याही अडथळ्याशिवाय राबवण्यासाठी मोकळीक दिली जात आहे, त्यावरून बंगालमधील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट होते. मुर्शिदाबादपासून सुरू झालेला हा भयानक हिंसाचार आता संपूर्ण बंगालमध्ये पसरताना दिसत आहे. सरकारी यंत्रणा केवळ दंगलखोरांसमोर निष्क्रिय झाली नाही तर अनेक ठिकाणी ती त्यांची मदतनीस किंवा चिथावणी देणारी बनली आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी, केंद्र सरकारने प्रशासनाचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आपल्या हातात घ्यावे आणि देशद्रोही आणि हिंदूविरोधी घटकांना त्यांच्या दुष्कृत्यांसाठी कठोर शिक्षा करावी याची खात्री करावी अशी मागणी यात करण्यात आली आहे. निवेदन देताना तालुका अध्यक्ष डॉ. संजय शाह, शहर अध्यक्ष राहुल लोहार, मितेश कामदार, सचिन चौधरी, पवन बारी, पीयूष जोशी, अमर सोनार, गोपाल वाघ, चेतन वाघ, मुकेश परदेशी आदी उपस्थित होते.



## दुचाकीची आमने-सामने जबर धडक : चार जण गंभीर जखमी !

जळगाव : प्रतिनिधी

दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या धडकेत चार जण गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास पाळधी बायपासजवळ घडली. अपघातातील एकाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरु आहे.

सविस्तर वृत्त असे कि, शहरातील पिंप्राळा भागातील रहिवाशी असलेले बापुराव महादु पाटील (वय ५६) हे आपल्या पत्नीसोबत संगिता बाबुराव पाटील (वय ४२) यांच्या सोबत दुचाकीने जळगावकडे येत होते. त्यावेळी समोरून येणारी दुचाकीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. हा अपघात पाळधी बायपास जवळ मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडला आहे. या भीषण अपघातात बापुराव पाटील व त्यांची पत्नी संगिता (पान २ वर)

## चौघांनी केली पती, पत्नी व मुलीला मारहाण !

जळगाव : प्रतिनिधी

अंगणात कांद्याची साल फेकल्याच्या कारणावरून शेजारी राहणाऱ्यांनी अभिमन अवचित भालेराव (५६, रा. पिंप्राळा हुडको) यांच्यासह त्यांच्या पत्नी व मुलीला मारहाण केली. तसेच धारदार शस्त्राने त्यांच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले. ही घटना १९ एप्रिल रोजी रात्री घडली. याप्रकरणी रामानंदनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंप्राळा हुडको येथे राहणारे भालेराव यांच्या पत्नीने अंगणात कांद्याची साल फेकली. त्याचा राग आल्याने शेजारी राहणाऱ्या चार जणांनी भालेराव यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच भालेराव यांच्या पत्नी आणि मुलीलादेखील मारहाण केली. एका जणाने धारदार शस्त्राने भालेराव यांच्या डोक्यावर, तर दुसऱ्याने हातातील कड्याने मारून गंभीर दुखापत केली. याबाबत पुढील तपास पोहेकॉ राजेश चव्हाण करीत आहेत.

## जळगाव जिल्ह्याची ग्रामीण गृहनिर्माण योजनेत अव्वल कामगिरी

जळगाव : प्रतिनिधी

राज्य शासनाच्या १०० दिवसीय कार्यक्रमांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनेत जळगाव जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळवले आहे. निर्धारित उद्दिष्टांपेक्षा अधिक म्हणजेच १३४ टक्के घरकुले पूर्ण करून जिल्ह्याने राज्यात आपली वेगळी छाप उमटवली आहे.

१०० दिवसांत ८ हजार ३६२ घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना जळगाव जिल्ह्यात तब्बल ११ हजार २४४ घरकुले पूर्ण करण्यात आली. या कामगिरीबद्दल ग्रामीण गृहनिर्माण योजनेचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांना पत्र पाठवून अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० डिसेंबर २०२४ रोजी १०० दिवसीय कार्यक्रमांची घोषणा केली होती. यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती – किमान १३ लाख घरकुलांना मंजुरी, ३ लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता, १ लाख घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे आणि ५ हजार लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे. या उद्दिष्टांच्या पार्श्वभूमीवर महाआवास अभियान राबवण्यात आले. या अभियानाअंतर्गत जळगाव जिल्ह्याने घेतलेली झपाट्याने काम करण्याची भूमिका आणि यशस्वी (पान २ वर)

## पतीनेच केला पत्नीवर धारदार सुरीने वार !



जळगाव : प्रतिनिधी

शहरातील रामेश्वर कॉलनी परिसरात घरात घुसून पतीने त्यांची पत्नी रुपाली नरेंद्र काकडे (३४) यांच्यावर धारदार सुरीने वार करीत गंभीर जखमी केले. ही घटना २१ एप्रिल रोजी रामेश्वर कॉलनीत घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नरेंद्र काकडे याने दरवाजाची कडी उघडून घरात प्रवेश केला. त्याचा जाब विचारल्याचा राग आल्याने त्याने पत्नी रुपाली यांच्यावर गळ्यावर आणि खांद्यावर वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी रुपाली काकडे यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून नरेंद्र काकडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नाईक पंकज पाटील करीत आहेत.

## गाडेगावजवळ महामार्गावर वाहनांवर दगडफेक !



जळगाव : प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगरकडून जळगावकडे येणाऱ्या वाहनांवर गाडेगावजवळील सुप्रिम पाईप कंपनीजवळ अर्धनग्न टोळक्याने अंडीसह दगडफेक केली. यामध्ये वाहनांच्या काचा फुटून नुकसान झाले. ही घटना दि. २० रोजी मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास घडली. वाहनांवर अचानक हल्ला झाल्यामुळे प्रवशांसह तेथून प्रवास करणाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील तांबापुरा परिसरातील मतीन पटेल, खलील पटेल, जाहिद शहा, आसिफ पटेल आणि आरिफ खान हे छत्रपती संभाजी नगरकडून जळगावकडे येत होते. त्यांचे वाहन गाडेगावजवळील सुप्रिम कंपनीजवळ आले असता, त्यांच्यासह इतर वाहनांवर अर्धनग्न असलेल्या टोळक्याने महामार्गावरुन येणारी वाहने अडवली, त्यानंतर त्यांनी अचानक वाहनांवर अंडीसह दगडफेक केली. अचानक झालेल्या दगडफेकीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या दगडफेकीच्या घटनेत वाहनांचे नुकसान झाले आहे. अनेक वाहनांमध्ये महिलांसह लहान मुल प्रवास करीत असल्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता.

अचानक झालेल्या (पान २ वर)

## लघुशंका केल्याच्या रागातून रिक्षाचालकावर शस्त्राने वार

जळगाव : प्रतिनिधी

सार्वजनिक ठिकाणी टपरीच्या बाजूला लघुशंका केल्याच्या रागातून निखिल धनराज अहिरे (वय २१, रा. मन्यारखेडा, ता. जळगाव) या रिक्षाचालकावर चॉपरसारख्या शस्त्राने वार केला. ही घटना २० एप्रिल रोजी मन्यारखेडा फाट्याजवळ घडली. जखमी तरुणावर शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. या प्रकरणी २१ रोजी नशिराबाद पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, मन्यारखेडा येथील निखिल अहिरे हे रिक्षाचालक असून मन्यारखेडा फाट्याजवळ एका टपरीच्या बाजूला ते लघुशंका करीत होते. त्यातून वाद होऊन टपरीचालकासह एकाने शिवीगाळ करीत मारहाण केली. दोघांनी निखिल यांच्या पोटात चॉपरसारख्या धारदार शस्त्राने वार करीत गंभीर जखमी केले. यामध्ये तरुण गंभीर जखमी झाला. त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अतिदक्षता विभागात उपचार करण्यात आले. याप्रकरणी अहिरे यांच्या फिर्यादीवरून नशिराबाद पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जागतिक पुस्तक दिन साजरा करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

### अमळनेर येथील साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयात स्तुत्य उपक्रम

अमळनेर : प्रतिनिधी

येथील साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयात जागतिक पुस्तक साजरा करून या दिनाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव संदीप घोरपडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माईड पार्लरच्या संचालिका दर्शना पवार व मुख्याध्यापक सुनील पाटील उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे दर्शना पवार यांनी मुलांना मुखपृष्ठ, मलपृष्ठ, प्रस्तावना, पुस्तक छपाई याविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच पुस्तके वाचून सारांश लेखन करण्याचे आवाहनही केले. पुस्तके समाधानी चांगलं आनंदी आयुष्य जगण्यासाठी वाचली पाहिजे, असे सांगितले. अध्यक्ष मनोगतात सचिव संदीप घोरपडे यांनी पुस्तके वाचली तर चांगली व्यक्तिमत्व समजतील.



त्यांनी केलेल्या कार्य व सत्कृत्य समाजापर्यंत पोहोचेल. अण्णा भाऊ साठे, बहिणाबाई चौधरी यांनी आपले परिपक्व विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी पुस्तकाची निवड केली. आपले भावना विश्व विस्तृत करण्यासाठी अनेक पुस्तके वाचली पाहिजे त्यामुळे बहुश्रुत वाचनाला चालना मिळते. डी. ए.धनगर यांनी झाडे लावण्याचे व जगवण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील पाटील यांनी सांगितले की, प्रसिद्ध लेखक विल्यम शेक्सपियर यांच्या जन्मदिनानिमित्त जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात येतो. तसेच वाचनाचे महत्त्व त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.ए.धनगर यांनी केले. आभार विलास चौधरी यांनी मानले. यशस्वीतेसाठी विद्या पाटील, देवेंद्र पाटील, समाधान पाटील, मुस्ताक शेख, ग्रंथपाल मुकेश पाटील, शुभम निकम व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.